दै. देशोन्नती

अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित चित्रकला स्पर्धा : बक्षिस वितरण सोहळा - दि. ०७.०२.२००९

संमिश्र

देशोन्नती

जळगाव : रविवार
दि. : ८ फेब्रुवारी २००९

# चित्रांद्वारे संस्कार मिळाले - कोलते

## पीपल्स बँक आयोजित चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण

*प्रतिनिधी / ७ फेब्रुवारी*

**जळगाव :-** चित्रांद्वारे संस्कार मिळाले..चित्रांमुळेच घडलो, असे प्रतिपादन प्रसिद्ध चित्रकार प्रभाकर कोलते यांनी केले. येथील पीपल्स बँकेतर्फे निबंध स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शंभू पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतीप्रसंगी कोलते यांनी आपल्या जीवनातील काही आठवणी सांगितल्या.

दी जळगाव पीपल्स बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त १४ डिसेंबर २००८ रोजी आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना आज ज्येष्ठ चित्रकार प्रभाकर कोलते, विद्याधर पानट, रंगनाथ पठारे, बँकेचे चेअरमन भालचंद्र पाटील, व्हाईस चेअरमन जयंतीभाई दोशी, संचालक राजाभाई मयूर, डॉ.प्रकाश कोठारी, सौ.सुरेख चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटकर आदी उपस्थित होते.

शहरातील यशवंतराव पाटील मुक्तांगणात सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात बक्षिस वितरणाप्रमाणेच प्रभाकर कोलते यांच्या 'कलेपासून केलपर्यंत' या पुस्तकाचेप्रकाशनही करण्यात आले.

तत्पूर्वी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गेल्या १४ डिसेंबर रोजी बहिणाबाई उद्यानात घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेत सुमारे अडीच हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. ही स्पर्धा अ, ब, आणि क अशा तीन गटात घेण्यात आली. त्यातील प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना प्रशस्तीपत्रासोबतच रोख पुरस्कार देण्यात आले. त्यात प्रथम क्रमांकासाठी १५०१ रुपये, द्वितीय १००१ तर ७०१ रूपयांचा तृतीय पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी बोलताना बँकेचे चेअरमन भालचंद्र पाटील यांनी बँक अर्थकारण, समाजकारण आणि कलात्मक बांधणीसारखे अनोखे उपक्रम राबवित असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन शंभू पाटील यांनी केले.